# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

सभा क्र.१४/ २०१५ — दिनांक ०६.०८.२०१५

स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर — वेळ- सायंकाळी ०६.०० वाजता

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा गुरुवार दिनांक ०६.०८.२०१५ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ २५६३/ २०१५, दिनांक ०६/०८/२०१५ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा गुरुवार दिनांक ०६.०८.२०१५ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे मा.अध्यक्ष श्री.विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री. विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.श्री.अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य
०३. मा.श्री.राजेंद्र जाधव, कार्यकारी अधिकारी, सदस्य

उपस्थितीची नोंद घेण्यात येऊन, विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१** — **दिनांक ०२.०८.२०१५ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.२४८** — **दिनांक ०२.०८.२०१५ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविणेत आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करणेत आले.**

---

**विषय नं.०२** — **सिंहस्थ कुंभमेळा- २०१५ निमित्त होणाऱ्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर साईभक्तांच्या सुरक्षिततेकरीता पोलिस विभागास द्यावयाचे सुरक्षा साहित्य खरेदीकामी उघडणेत आलेल्या तांत्रिक व कमर्शिअल निविदांवर चर्चा करणे.**

प्रस्ताव- सिंहस्थ कुंभमेळा २०१५, शताब्दी महोत्सव २०१८ चे अनुषंगाने तसेच साईभक्तांचे सुरक्षिततेच्या दृष्टिने मंदिर व परीसरात सुरक्षा यंत्रणा विकसीत करणेकामी सुरक्षा साहीत्य खरेदी करावयाचे आहेत. त्याकामी मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर सदर विषय मंजुरीसाठी सिव्हील ॲप्लीकेशन नं.३५००/२०१५ दाखल करण्यात आले होते. सदर सिव्हील ॲप्लीकेशन अन्वये मा. उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.०६/०५/२०१५रोजी येणाऱ्या खर्चास मान्यता दिलेली आहे.त्याचप्रमाणे दि.१०/०७/२०१५ ते दि..३१/०७/२०१५ रोजी ई-टेंडरींगव्दारे प्रसिध्द करण्यात आले.

दि.१४/०७/२०१५ रोजी झालेल्या प्री-बीड मिटींगमध्ये ०५ प्रतिनिधी ०३ कंपन्यांचे वतीने हजर होते. sample साहीत्य न आणल्यामुळे सदर कंपन्यांना दि.०१/०८/२०१५ रोजी मा.जिल्हाधिकारी, अ.नगर येथे sample साहीत्य दाखविणेकामी बोलावण्यात आले. त्याच दरम्यान आलेल्या सर्व कंपन्यांना व महाराष्ट्र फेडरेशन, नाशिक, एशियन सेल्स, नाशिक, वैभव शामीयाना, अमरावती तसेच मा. पोलीस अधिक्षक, कार्यालय यांचेमार्फत दुरध्वनीव्दारे सदर प्री-बीड मिटींगकरीता sample साहीत्या सहीत हजर रहावे असे कळविलेले होते. परंतु दि.०१/०८/२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या सभेत एकाच पुरवठाधारकाने सदरचे साहीत्य सादर केले, त्यामध्ये साईन बोर्ड, मॅनिला रोप, ट्राफीक फ्लोरोसेंट जॅकेट, रिचार्जेबल टॉर्च, मेगा फोन, ट्राफीक पोलीस बॅटरी स्टीक, डी.एफ.एम.डी, येलोपोलीस टेप, ब्रेथ ॲनालाईजर, एच.एच.एम.डी., रेनकोट असे साहीत्य मे. युनिक डेल्टा फोर्स प्रा.लि. पुणे यांनी सादर केले. दि.०५/०८/२०१५ रोजी असलेल्या टेक्नीकलबीड ओपनिंग करीतामे. युनिक डेल्टा फोर्स, पुणे व मे.व्हेंन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन्स, नॉईडा या दोन निविदाधारक यांनी ई-निविदा भरलेल्या आहेत. दोनही निविदाधारकांनीत्यांचे sample साहीत्य बरोबर आणलेले होते. मे.व्हेंन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन्स ,नॉईडा यांनी पोलीस पोलीस बॅटरी स्टीक, रिचार्जेबल टॉर्च, एच.एच.एम.डी., डी.एफ.एम.डी इ. साहीत्य सादर करण्यात आले.

सिंहस्थ कुंभमेळा २०१५ करीता सदर साहीत्य आवश्यक असल्यामुळे व उपलब्ध कालावधी तसेच मुदतवाढीची वेळ निघुन गेलेली असल्याने, एक अपवादात्मक बाब म्हणुन निविदा उघडण्यात आल्या व त्यांचे कागदपत्र तपासुन, कमर्शियल निविदा उघडण्यात आल्या व त्यांचे comparative statement ऑनलाईन काढण्यात आले. सदर comparative statement मधिल अ.नं. १,२,३,४,५,६,७,८,९,१५,२३ मे.युनिक डेल्टा फोर्स प्रा.लि. पुणे या कंपनीचे दर प्राप्त झालेले आहेत.

अ.नं.१९ या साहीत्याला कोणत्याही पुरवठाधारकाचे दर प्राप्त झालेले नाही.तसेच उर्वरीत साहीत्यांकरीता दोनही निविदा धारकांचे दर प्राप्त झालेले आहेत.

अ.नं.१० ड्रॅगन लाईट सदर साहीत्याकामी भरलेल्या दोघा निविदाधारकांच्या दरात तफावत आढळुन येत आहे.

अ.नं.१४ प्री-फॅब्रीकेटेड पोस्ट हट यांचे आलेले दर रुपये- ४,६३,७५०/- आहेत. परंतु मा.पोलीस अधिक्षक यांचे पत्रानुसार सदरचे दर हे रुपये- ६०,०००/- इतके दर्शविलेले आहे. या संदर्भात डी.जी.ऑफिस यांचे दर तपासुन, दर निश्चित करण्यात यावे, असे मत आहे.

अ.नं. १७ बुलेट प्रुफ पिकेट/मोर्चा मागणीप्रमाणे पिकेट/मोर्चा निविदेत आहे. परंतु मे.युनिक डेल्टा फोर्स प्रा.लि.पुणे या निविदाधारकाने बुलेट प्रुफ जॅकेटचे दर निविदेमध्ये नमुद केलेले असल्यामुळे, मे.व्हॅन्टेज यांनी पिकेटचे दर नमुद केलेले आहे.

अ.नं.१८ पोर्टेबल वॉक थ्रु मेटल डीटेक्टर माग्रणीप्रमाणे आऊट डोअर आहे. परंतु मे.युनिक डेल्टा फोर्स प्रा.लि.पुणे यांनी इन डोअरचे दर निविदेमध्ये नमुद केलेले आहे व मे.व्हॅन्टेज यांनी आऊट डोअरचे दर नमुद केलेले आहे.

तरी सदरच्या ऑनलाईन दोनच निविदा प्राप्त झालेल्या असल्याने री-टेंडरींग करावयाचे झाल्यास साधारणतः शॉर्ट टाईम टेंडर करीता किमान ०७ दिवस व टेंडर उघडणेकामी असे एकुण- ९ दिवसांचा कालावधी लागणार आहे. सदरची निविदा पाहता दोनच निविदाधारक असल्याने री-टेंडरींग केल्यानंतरही इतका प्रतिसाद मिळेल याची शाश्वती नाही. तसेच री-टेंडरींग केल्यानंतर निविदाधारकास कार्यादेश देऊन, पुरवठाधारकांना सिंहस्थ कुंभमेळयासाठी विहीत वेळेत पुरवठा होईलच याची शाश्वती नाही.

तसेच याबाबत दि.०६/०८/२०१५ रोजी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर केला असता, सदर प्रस्तावावर मा.मुख्यलेखाधिकारी, लेखाशाखा यांनी खालीलप्रमाणे बाबी नमुद केलेल्या आहेत.

१. ज्या साहीत्यांचे दर डी.जी. कार्यालय यांचेकडुन निश्चित झालेले आहे. त्या मर्यादेमध्ये दर स्विकृत करणे योग्य होईल.
२. ज्या साहीत्यांचे दर करार मुदत संपली आहे त्याचेमागील दर व निविदेतील दर यांचा तौलनीक अभ्यास करुन वाटाघाटीव्दारे ठरविता येईल.
३. ज्या वस्तुचे दर डी.जी.ऑफिस आर.सी (मागील) मध्ये उपलब्ध नाहीत त्यांचे प्रत्यक्ष मार्केटमधिल एम.आर.पी. पाहुन निर्णय घेता येईल.
४. प्री-फॅब्रीकेट पोस्ट हट व प्री-फॅब्रीकेट रुम यांचे दर एकच व्हेंडरने भरलेले असल्याने अवास्तव वाटतात. त्यांची फेर निविदा होणे आवश्यक आहे.
५. कामाची निकड पाहुन निर्णय व्हावा आदेशार्थ सादर.

वरीलप्रमाणे मा.उप कार्यकारी अधिकारी यांनी देखिल- दोनच निविदा प्राप्त झालेल्या आहेत. म्हणुन सदर निविदा रद्द करुन, अल्प कालावधीसाठीफेर निविदा काढता येईल असे नमुद केलेले आहे. यावर नमुद सर्व बाबी विचारात घेऊन समितीने कृपया उचित निर्णय घ्यावा असे मा. कार्यकारी अधिकारी सो. यांनी नमुद केलेले आहे.

तरी सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ करीता सुरक्षा साहीत्य खरेदीकामी उघडण्यात आलेले टेंडरचे री-टेंडरींग करावे किंवा कसे तसेच सदर उघडण्यात आलेले टेंडर यांचे न्युनतम दर असलेल्या पुरवठाधारकास वाटाघाटी करणेकामी निमंत्रित करुन, त्यांना कार्यादेश द्यावा किंवा कसे, याबाबतच्या आदेशास्तव सविनय सादर.

निर्णय क्र.२४९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सिंहस्थ कुंभमेळा- २०१५ चे कालावधीत, मुख्यतः शाहीस्नानांच्या वेळेस शिर्डीमध्ये भाविकांची प्रचंड गर्दी होण्याची शक्यता आहे व या गर्दीचे नियोजन तसेच भाविकांच्या सुरक्षीततेसाठी पोलिस विभागाने मागणी केलेले सुरक्षा साहित्य तातडीने खरेदी करणे आवश्यक असल्यामुळे व उपलब्ध कालावधी तसेच मुदतवाढीची वेळ निघुन गेलेली असल्याने, उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या दोन ई-निविदांमधील तांत्रिक कागदपत्रे तपासून त्यांचे दर उघडणेत आलेले आहेत. परंतु सदरहूकामी दोनच निविदा प्राप्त झालेल्या असल्याने यासाठी फेर निविदा मागविणेत याव्यात.**

**सध्या प्रस्तावितकामी दोनच निविदा प्राप्त झालेल्या आहेत, फेर-निविदा मागविल्यानंतरही तीन पेक्षा कमी निविदा येण्याची शक्यता नाकारता येत नाही, याकरीता पर्यायी व्यवस्था म्हणून सुरक्षा साहित्य खरेदीसाठी व सदरहू साहित्य भाडेतत्वावर घेणेसाठी वेगवेगळया समांतर अल्प मुदतीच्या निविदा मागविण्यात याव्यात.**

**तसेच याचवेळी खालीलप्रमाणे चर्चा झाली.**

**उपरोक्त दोन्ही निविदाप्रक्रिया पुढीलप्रमाणे राबविणेत यावी. दि.१०.०८.२०१५ ते दि.१७.०८.२०१५ या कालावधीत ऑनलाईन निविदा प्रकाशित कराव्यात व दि.१८.०८.२०१५ रोजी तांत्रिक निविदा उघडून पुढील कार्यवाही करावी.**

**सुरक्षा साहित्य हे कायमस्वरुपी आवश्यकता असते याकरीता कार्यादेश दिल्यानंतर काही प्रमाणातील साहित्याचा कुंभमेळयाच्या कालावधीनंतर पुरवठा होत असेल, तरीही स्विकारणेत यावे.**

**ज्या साहित्यासाठी आय.एस.ओ. आवश्यक असेल, अशा साहित्यासाठीच आय.एस.ओ. ची अट नमूद करावी. निविदेमध्ये इतर अटी/ शर्तीसह निविदाधारक एका वस्तूसाठीचे दर देऊ शकतील व निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकारी संस्थानने राखून ठेवलेला आहे, याचाही समावेश करणेत यावा.**

**तसेच सुरक्षा साहित्य खरेदीची सभा असल्यामुळे आजचे सभेत मा.डॉ.सौरव त्रिपाठी, पोलिस अधिक्षक, अहमदनगर हे उपस्थित होते. सदरहू साहित्यामधील बॅरीकेडस् लहान व मोठे अशा दोन प्रकारामध्ये मागणी केलेली होती. त्यावर बॅरीकेडस् चे पुरवठादार शंकर मेटल वर्कस्, कानपुर यांनी बॅरीकेडस् साठी खालीलप्रमाणे दर दिलेले आहेत व लहान बॅरीकेडस् तयार करणेसाठी कालावधी लागेल तसेच मोठे बॅरीकेडस् तयार असून २० ऑगष्ट पर्यंत शिर्डी पोहोच करणार असल्याचे कळविले आहे.**

| अ.नं. | तपशील | नग | शासनाच्या करारानुसार प्रति नग दर रु. | एकूण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| ०१ | लहान बॅरीकेडस् | 250 nos | 9078.79 | 2269698.00 |
| ०२ | मोठे बॅरीकेडस् | 250 nos | **10990.00** | **2747500.00** |
| | | | Def.Amt. | 477802.00 |

14 % sale Tax +.25% Dept.Charges +.84 per K.M. Transport Charges+14 % service Tax + Other Charges

**उपरोक्त दरांबाबत पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांचा सल्ला घेण्यात आला. सुरक्षीततेच्या कारणास्तव बॅरीकेडस्‌ ची तातडीने गरज असून उपलब्ध कालावधीमध्ये मोठया बॅरीकेडस्‌ चा पुरवठा होणार असल्याने लहान बॅरीकेडस्‌ ऐवजी मोठे बॅरीकेडस्‌ घेण्याचे मान्य केले. तरी शंकर मेटल वर्कस्‌, कानपुर यांना शासनाच्या दर करारानुसारच्या दराने मोठया बॅरीकेडस्‌ पुरविणेकामी कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- सी.सी.टी.व्ही. कंट्रोल सेलप्रमुख)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.**

**आयत्या वेळेचा विषय नं.०१** — **नाशिक येथील कुंभमेळयाचे अनुषंगाने साईधर्मशाळा येथे होणा-या गर्दीचे काळामध्ये वाढीव मंडपामध्ये देण्यात येणारे चादरीचे डिपॉझीट घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** साई धर्मशाळा हा विभाग दिनांक १८/०७/२०१३ पासुन सुरु झालेला आहे, यामध्ये एकुण सहा इमारती मिळुण १९२ हॉल असुन एक इमारतीत साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयास वापवण्यास देण्यात आलेली आहे. उर्वरीत पाच इमारतीमधील १६० हॉलमध्ये साईभक्तांची, पालखीधारकांची, तसेच सहलीमधील साईभक्तांची निवासव्यवस्था करण्यात येते.

दि.१७/०५/२००९ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचा ठरावामधील आयत्या वेळचा विषय क्रं. ४० निर्णय क्र. ५०३ अन्वये प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे संस्थानचे निवासस्थानाचे सेवा आकार वाढविण्यात यावे, असे ठरले.
नाशिक सिंहस्थ्‌ कुंभमेळा सन २०१५ मध्ये साधारणपणे दिनांक २७ जुलै २०१५ ते २६ सप्टेंबर २०१५ या पर्वणीचे कालावधीत मोठया प्रमाणावर भाविक शिर्डी येथे येतील, असा अंदाज आहे. या कालावधीत संभाव्य गर्दीच्या उद्देशाने साई धर्मशाळा येथील वाढीव मंडपामध्ये साईभक्तांसाठी करावयाच्या इतर आवश्यक सोयी सुविधांमध्ये वाढीव मंडपामध्ये साई भक्तांना गादी, चादर देवुन निवासाची व्यवस्था करण्यात येणार आहे.

साईधर्मशाळा विभागामध्ये घालण्यात येणा-या मंडपामध्ये साई भक्तांना निवासाची व्यवस्था करतांना त्यांना मंडपामध्ये गादी, चादर द्यावी लागणार आहे. त्यासाठी त्यांचे कडुन रु. १०/- प्रति डोई प्रमाणे सेवा आकार घ्यावा लागणार आहे, त्यानुसार भक्तांना चादर देतेवेळी एका कुटुंबास डिपॉझीट म्हणुन रु. ३००/- घ्यावे लागणार आहे.

साईधर्मशाळा विभागामध्ये घालण्यात येणा-या मंडपामध्ये साई भक्तांना निवासाची व्यवस्था करतांना त्यांना मंडपामध्ये गादी, चादर द्यावी लागणार आहे. सदर कामी चादर देतेवेळी साईभक्तांकडुन चादरसाठी प्रथम डिपॉझीट घ्यावे लागणार आहे. सदर चादरीचे डिपॉझीट म्हणुन एका कुटुंबास (०१ ते ०४ व्यक्तींपर्यंत) रु.३००/- (अक्षरी रु.तिनशे मात्र) घेवून चादर हरवल्यास संबंधीतांकडुन प्रत्येक चादरीची नुकसान भरपाई म्हणुन संस्थान मार्फत खरेदी करण्यात आलेल्या दरानुसार रक्कम वसुल करण्यात येईल.

साईधर्मशाळा विभागामध्ये घालण्यात येणा-या मंडपामध्ये साई भक्तांना निवासाची व्यवस्था करतांना त्यांना मंडपामध्ये गादी, चादर द्यावी लागणार आहे. त्यासाठी त्यांचे कडुन रु.१०/- प्रति डोई प्रमाणे सेवा आकार घ्यावा लागणार आहे, त्यानुसार भक्तांना चादर देतेवेळी एका कुटुंबास (०१ ते ०४ व्यक्तींपर्यंत) डिपॉझीट म्हणुन रु. ३००/- घ्यावे लागणार आहे.

तरी मंडपामध्ये साईभक्तांची निवासाची व्यवस्था करते वेळी देण्यात येणा-या प्रती गादीसाठी सेवाआकार म्हणुन रु.१०/- व चादरीसाठी एका कुटुंबास (०१ ते ०४ व्यक्तींपर्यंत) डिपॉझीट रु.३००/- (अक्षरी तिनशे रु.मात्र) स्विकारण्यास मान्यता मिळणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयासाठी सादर.

**निर्णय क्र.२५०** **उपरोक्त प्रस्तावावर चर्चा होऊन असे ठरले की, नाशिक येथील कुंभमेळयाचे अनुषंगाने होणा-या गर्दीचे कालावधीत साईभक्तांच्या निवासासाठी केलेल्या वाढीव मंडपामध्ये साईभक्तांना देण्यात येणा-या चादरींचे डिपॉझीट घेण्यात येऊ नये, ते मंडपाबाहेर जाते वेळेस तेथे नियुक्त असलेल्या सुरक्षा कर्मचारी/ मदतनीस यांनी साईभक्ताने चादर जमा केली आहे का, याची खात्री करुन घ्यावी.**(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईधर्मशाळा)

---

वरील निर्णय क्र.२४८ ते २५० सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर रात्रौ ०९.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| स्वाक्षरित/-xxx | स्वाक्षरित/- xxx | स्वाक्षरित/- xxx |
|---|---|---|
| (राजेंद्र जाधव) | (अनिल कवडे) | (विनय जोशी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी